Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

# दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।सोमवार, दि. ११ मे २०२६। वर्ष १ ।अंक ३६ ।पाने २।
DIGITAL EDITION



अनधिकृत बांधकामावर कारवाईसाठी ज्योती म्हात्रे यांचे उपोषण!

(पान २ वर)

## Selected

### एमएमआरडीएवरील आरोपांचा अहवाल जाहीर करा-रोहित पवार

**मुंबई ।** रोहित पवार यांनी मुंबईतील मेट्रो प्रकल्पांशी संबंधित कथित भ्रष्टाचार प्रकरणात एमएमआरडीएवरील आरोपांचा चौकशी अहवाल तातडीने जाहीर करण्याची मागणी केली आहे. फ्रान्सच्या सीस्त्रा या सल्लागार कंपनीने २०२५ मध्ये एमएमआरडीए प्रशासनावर गंभीर आरोप केले होते. या प्रकरणाची दखल घेत एकनाथ शिंदे यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये चौकशीचे आदेश देत एका महिन्यात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते "हा केवळ एमएमआरडीएचा प्रश्न नसून राज्याच्या प्रतिमेशी संबंधित विषय आहे. त्यामुळे चौकशी अहवाल जाहीर करून दोषींवर कठोर कारवाई करावी," अशी मागणी त्यांनी नगरविकास विभागाकडे केली आहे. येत्या अधिवेशनात हा मुद्दा विधिमंडळात उपस्थित करणार असल्याचेही पवार यांनी स्पष्ट केले.

## मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच थलपतीने केली कमाल

# तमिळनाडूत 'विजय राज'!

### सर्वांना २०० युनिट मोफत वीज आणि महिला सुरक्षेसाठी महत्त्वाचे निर्णय



जन सम्राट टाईम्स

**चेन्नई | प्रतिनिधी :** तमिळनाडूच्या राजकारणात एका नव्या युगाची सुरुवात झाली आहे. 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) पक्षाचे संस्थापक आणि जगभरात 'थलपती' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुपरस्टार सी. जोसेफ विजय यांनी तमिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. या भव्य शपथविधी सोहळ्याने राज्यातील सत्तासंघर्षाला पूर्णविराम देत एका नवीन नेतृत्वाचा उदय झाला आहे.

शपथविधी सोहळ्यासाठी जवाहरलाल नेहरू इनडोअर स्टेडियम खच्चून भरले होते व बाहेर 50 हजारच्या आसपास चाहत्यांची गर्दी होती. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांची या कार्यक्रमास विशेष उपस्थिती होती. विजय यांचे माता-पिताही यावेळी उपस्थित होते. लेक मुख्यमंत्री म्हणून शपथ घेताना त्यांना भावना अनावर झाल्यास होत्या. हे आईसाठी खास मदर्स डे गिफ्ट असल्याचे विजय यांनी सोहळ्यापूर्वी सांगितले होते. विजय यांचे वडील दिग्दर्शक असून त्यांनीच त्याला अभिनेता म्हणून घडवले. शपथविधी सोहळ्यादरम्यान एक नाट्यमय प्रसंग पाहायला मिळाला. मुख्यमंत्री म्हणून शपथ घेत असताना विजय यांनी निर्धारित प्रोटोकॉल बाजूला ठेवून अचानक भाषण देण्यास सुरुवात केली. यावेळी राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर यांनी त्यांना तात्काळ रोखले आणि केवळ विहित नमुन्यातील शपथ वाचण्याची सूचना केली. राज्यपालांच्या हस्तक्षेपानंतर विजय यांनी स्वतःला सावरत घटनात्मक प्रक्रियेनुसार आपली शपथ पूर्ण केली. या प्रोटोकॉलच्या भंगाची सध्या राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. विजय यांच्या मंत्रिमंडळात एकूण ९ नेत्यांना स्थान देण्यात आले आहे. आपल्या कॅबिनेटची निवड करताना त्यांनी राजकीय अनुभव, तरुणांचे प्रतिनिधित्व आणि राज्यातील जातीय समीकरणे यांचा अतिशय विचारपूर्वक समतोल साधल्याचे दिसून येते.

#### भारतीय राजकारणातील बदलाची नांदी!

टीव्हीके'चा तामिळनाडूतील विजय म्हणजे भारतीय राजकारणातील बदलाची नांदी ठरणार आहे. युवा पिढी म्हणजेच 'जेन-झी'चा विजय यांच्या यशात सिंहाचा वाटा आहे. देशभरातील युवा पिढीला आता आपले लोकप्रतिनिधी हे उच्चशिक्षित असावेसे वाटतेय. तामिळनाडूने त्याची पूर्तता केली आणि आता हे रोल मॉडेल देशभर हवेहवेसे वाटणार आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## एम. जे. कॉलेज परिसरातील तीन कॅफेंवर पोलिसांची धडक कारवाई

### गैरप्रकारांवर पोलिसांची करडी नजर

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव शहरातील विद्यार्थ्यांची सर्वाधिक वर्दळ असलेल्या एम. जे. कॉलेज परिसरातील तीन कॅफेंवर पोलिसांनी अचानक छापा टाकत धडक कारवाई केली. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून इतर कॅफे चालकांचेही धाबे दणाणले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. एम. जे. कॉलेज परिसरातील काही कॅफेंमध्ये नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तसेच गैरप्रकार सुरू असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांनी विशेष पथकाची स्थापना केली होती.'दामिनी पथका'चीही सहभागिता या विशेष पथकामध्ये पोलीस कर्मचारी अवेश शेख, प्रणय पवार आणि अमोल ठाकूर यांचा समावेश होता. विशेष म्हणजे महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेसाठी कार्यरत असलेले दामिनी पथक देखील या कारवाईत सहभागी झाले होते.दामिनी पथकाच्या उपस्थितीमुळे कॅफेंमध्ये सुरू असलेल्या गैरप्रकारांवर तसेच 'कपल बॉक्स'सारख्या प्रकारांवर पोलिसांची करडी नजर असल्याचे स्पष्ट झाले आहे.



#### कॉलेज परिसरातील वातावरणावर लक्ष

महाविद्यालयीन परिसरात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी-विद्यार्थिनींची वर्दळ असते. त्यामुळे परिसरातील शांतता, सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. पोलिसांनी तीनही कॅफेंची कसून झडती घेतली असून संबंधित प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. या कारवाईनंतर परिसरातील इतर कॅफे चालकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## योगी मंत्रिमंडळाचा विस्तार; ६ नवीन चेहऱ्यांचा समावेश

जन सम्राट टाईम्स

**लखनौ | प्रतिनिधी :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आपल्या मंत्रिमंडळाचा विस्तार करत सहा नवीन चेहऱ्यांना सरकारमध्ये स्थान दिले आहे. लखनौ येथील राजभवनात राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी या नवीन मंत्र्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. आगामी २०२७ च्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हा विस्तार करण्यात आला असून, याला 'मिशन २०२७' ची मोठी तयारी मानले जात आहे. नवीन मंत्र्यांच्या समावेशामुळे योगींच्या टीममध्ये आता प्रादेशिक आणि सामाजिक संतुलनावर अधिक भर देण्यात आला असून, प्रशासकीय कामात अधिक गती आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. समाजातील विविध मागास आणि वंचित घटकांना प्रतिनिधित्व देऊन सर्वसमावेशक राजकारणाचा संदेश देण्याचा प्रयत्न यातून करण्यात आला आहे. विशेषतः पश्चिम उत्तर प्रदेश आणि पूर्वांचल यांसारख्या महत्त्वाच्या भागांतील नेत्यांना संधी देऊन प्रादेशिक समतोल साधला गेला आहे. २०२७ मध्ये होणाऱ्या आव्हानात्मक निवडणुकीत विरोधकांना रोखण्यासाठी आणि सरकारच्या जनकल्याणकारी योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी या 'निवडक ६' शिलेदारांवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

## धावत्या गाडीत आईने दिला बाळाला जन्म

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** एक्सप्रेस गाडीचा जनरल डबा, प्रवाशांची भरमसाठ गर्दी आणि अचानक एका गर्भवती महिलेला सुरू झालेल्या तीव्र प्रसूती कळा... एखाद्या सिनेमात शोभेल अशी थरारक घटना पुणे-सुपौल एक्सप्रेसमध्ये नुकतीच घडली. धावत्या गाडीत एका गर्भवती महिलेने बाळाला जन्म दिला. पुणे रेल्वे स्थानकावरून बिहारमधील सुपौलकडे जाणारी पुणे-सुपौल एक्सप्रेस नेहमीप्रमाणे शनिवारी सायंकाळच्या सुमारास सुटली. या गाडीत मूळच्या उत्तर प्रदेशातील रहिवासी रोक्साना खातून (वय २८) आणि त्यांचे पती जमील बेलावर जनरल डब्यातून प्रवास करत होते. ते उत्तर प्रदेशमधील पंडित दीनदयाळ उपाध्याय स्थानकावर उतरणार होते. पण, घडले उलटेच. रोक्साना खातून गर्भवती होत्या.

रात्री उशिरा गाडी अहिल्यानगर स्थानकाच्या जवळ येत असताना अचानक रोक्साना यांना प्रसूती वेदना सुरू झाल्या. गाडी प्रचंड वेगाने धावत होती. त्यात जनरल डब्यातील प्रवाशांच्या भरमसाठ गर्दीने दोघा पती-पत्नीला काय करावे सुचेनासे झालेले. रोक्साना यांच्या किंकाळ्यांनी डब्यातही तणावाचे वातावरण निर्माण झालेले.या सगळ्या प्रकाराची माहिती मिळताच मध्य रेल्वेकडून ऑपरेशन मातृशक्ती राबवण्यात आले. अहिल्यानगर पोस्टचे कॉन्स्टेबल सोमनाथ पाठाडे आणि हेड कॉन्स्टेबल विश्वजीत काकडे यांनी विलंब न लावता जनरल डब्याकडे धाव घेतली.हातात वेळ कमी होता आणि रुग्णालयही बऱ्याच अंतरावर होते. अशा वेळी प्रसंगावधान ओळखून डब्यातील महिला प्रवाशांच्या मदतीने डब्यातच प्रसुतीसाठी आवश्यक वातावरण निर्माण करण्यात आले.

## राज्यातील ३१ कारागृहांमध्ये बहरली शेती

जन सम्राट टाईम्स



**मुंबई: :** राज्यातील कारागृहांत २६ हजारांवर कैदी विविध गुन्ह्यांत शिक्षा भोगत आहेत. त्याच कैद्यांच्या हाती कुदळ, फावडा यासारखी अवजारे देऊन त्यांच्या हातून शेती फुलवली जात आहे. नाशिक रोड, येरवडा, पैठण, विसापूर अशा विविध ३१ कारागृहांतील या कैद्यांनी ५९६ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आणले असून भात, ज्वारी, बाजरी, भुईमूग, सोयाबीनबरोबरच कांदा, मूळा, पालक, टोमॅटोचीही शेती या तुरुंगांमध्ये बहरली आहे. या कैद्यांनी वातावरणाच्या आव्हानांनाही तोंड दिले असून २०२५-२६ साली पावसाने केलेल्या नुकसानींनंतरही ५.४६ कोटींचे उत्पादन शेतीतून मिळाले आहे. राज्यातील ३१ कारागृंहांत शेती केली जाते. शेतीसाठी एकूण ५९६.५९ हेक्टर क्षेत्र उपलब्ध असून ३३०.८८ हेक्टर क्षेत्रावर वांगी, कोबी, मिरची, फ्लॉवर, कांदा, वाटाणा, पालक, टोमॅटो, बटाटा, मेथी, राजगिरा, मुळा यांसारख्या पिकांबरोबरच हरभार, तूर यासारखी कडधान्ये तसेच गहू, भात, ज्वारी, बाजरी यासारखी अन्नधान्य पिके आणि भूईमूग, मोहरी, सोयाबीन यांसारखी गळीतधान्य पिकवली जातात. उर्वरित १८२.६५ हेक्टर क्षेत्रावर वनीकरण व फळपिकांची लागवड करण्यात आलेली आहे. शेतीबरोबरच कैद्यांकडून सामाजिक वनीकरणही केले जात आहे. २०२५-२६मध्ये या कैद्यांच्या हातून १ लाख ८० हजार २६५ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. पैठण खुल्या कारागृहात १५८.७७ हेक्टर क्षेत्र, येरवडा खुल्या कारागृहातील १०३ हेक्टर तर विसापूर खुल्या कारागृहातील ४४.२६ हेक्टर क्षेत्रात शेती केली जात आहे.तुरुंगांमध्ये जैविक शेतीला (सेंद्रीय) प्राधान्य देण्यात आले असून अधिकाधिक भर हा जैविक खतांवरच दिला जात आहे. या पद्धतीमुळे रासायनिक खतांचा वापर २० टक्क्यांखाली आला असून ८० टक्के शेती ही जैविक शेती आहे. यातून या कैद्यांनी अन्य शेतकऱ्यांसाठीही एक उदाहरण घालून दिले आहे.येरवडा तुरुंगात 'दहा ड्रम थेअरी'च्या माध्यमातून वांगी, कोबी, मिरची, फ्लॉवर, कांदा, पालक, टोमॅटो, बटाटा, मेथी, मुळा इत्यादी भाजीपाल्याची लागवड करण्यात आली आहे. संपूर्णतः सेंद्रीय शेतीवर भर दिला जात असल्यामुळे रासायनिक खतांपेक्षा हा भाजीपाला अधिकाळ टिकाऊ ठरला आहे. त्याचप्रमाणे नाशिक रोड येथील खुल्या कारागृहात खरीप हंगामात महाबीजच्या माध्यमातून १२ हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन बीजोत्पादन करण्यात आले.

## टॉवर चौकातील नामांकित लॉजवर पोलिसांचा छापा

### एलसीबीची मध्यरात्री धडक कारवाई

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव शहरातील टॉवर चौक परिसरातील एका नामांकित लॉजमध्ये सुरू असलेल्या कथित वेश्याव्यवसायावर स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) शनिवारी मध्यरात्री धडक कारवाई करत मोठा पर्दाफाश केला. शहर पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर सुरू असलेल्या या रॅकेटमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अत्यंत गोपनीय पद्धतीने राबविण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी मुख्य आरोपीला ताब्यात घेत काही महिलांची सुटका केली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित लॉजमध्ये महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून बेकायदेशीररित्या देहविक्री करवून घेतली जात असल्याची माहिती राहुल गायकवाड यांना मिळाली होती. माहितीची खातरजमा झाल्यानंतर जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखा आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष यांनी संयुक्त कारवाईची योजना आखली. बनावट ग्राहक पाठवून सापळा या कारवाईदरम्यान पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून लॉजमधील व्यक्तीशी पैशांची बोलणी केली. व्यवहार निश्चित होताच संबंधित ग्राहकाने पोलिसांना इशारा दिला. त्यानंतर दबा धरून बसलेल्या पथकाने लॉजवर छापा टाकत सुरू असलेला कथित वेश्याव्यवसाय उघडकीस आणला. या कारवाईत पोलिसांनी राजू मोतीराम जोशी याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून रोख रक्कम आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. पीटा कायद्यान्वये गुन्हा दाखल आरोपीविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा (पीटा) अंतर्गत कलम ३, ४ आणि ५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या रॅकेटचे धागेदोरे इतर भागांपर्यंत पोहोचले आहेत का, याचा तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान, या प्रकरणात सापडलेल्या महिलांची सुटका करून त्यांचे समुपदेशन सुरू करण्यात आले असून त्यांना सुधारगृहात पाठविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

#### वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावीत आणि डीवायएसपी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड तसेच एलसीबी आणि एएचटीयू पथकाने केली.शहर पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर सुरू असलेल्या या रॅकेटमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. अत्यंत गोपनीय पद्धतीने राबविण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी मुख्य आरोपीला ताब्यात घेत काही महिलांची सुटका केली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## पेट्रोल-डिझेल जपून वापरा; पंतप्रधान मोदींचे जनतेला आवाहन

### पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर देशवासीयांना सतर्कतेचा इशारा

जन सम्राट टाईम्स


**नवी दिल्ली:** पश्चिम आशियामध्ये अमेरिका आणि इराण यांच्यात वाढत असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून महत्त्वाचे आवाहन केले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमतीत होणारी अनपेक्षित वाढ आणि पुरवठा साखळीत निर्माण होऊ शकणारे अडथळे लक्षात घेता, नागरिकांनी पेट्रोल आणि डिझेलचा अत्यंत जपून वापर करावा, असे आवाहन पंतप्रधानांनी केले आहे. या जागतिक पेचप्रसंगामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि परकीय चलन साठ्यावर मोठा ताण पडण्याची शक्यता सरकारने वर्तवली आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील तणावामुळे 'होर्मुझची सामुद्रधुनी' हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल पुरवठा मार्ग बाधित होण्याचा धोका निर्माण झाला आहे. भारत आपल्या गरजेच्या कच्च्या तेलाची मोठी आयात या भागातून करतो. जर या मार्गावरून होणारी वाहतूक विस्कळीत झाली, तर जागतिक स्तरावर तेलाचा तुटवडा निर्माण होऊ शकतो, ज्याचा थेट परिणाम भारतातील इंधनाच्या दरांवर आणि उपलब्धतेवर होईल. ही परिस्थिती हाताळण्यासाठी आगाऊ खबरदारी म्हणून इंधन बचतीचा पवित्रा घेण्याचे संकेत पंतप्रधानांनी दिले आहेत. पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले की, हे संकट केवळ राजकीय नसून त्याचे थेट पडसाद आर्थिक क्षेत्रावर उमटत आहेत. "इंधनाची बचत ही केवळ वैयक्तिक पैशांची बचत नसून ती राष्ट्रसेवा आहे," असे सांगत त्यांनी जनतेला अनावश्यक प्रवास टाळण्याचे आणि शक्य तिथे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याचे आवाहन केले आहे. देशातील इंधनाचा साठा सुरक्षित ठेवण्यासाठी आणि अचानक उद्भवणाऱ्या संभाव्य महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी नागरिकांचे सक्रिय सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

#### पर्यायी तेल पुरवठादार देशांशी चर्चा

केंद्र सरकार सध्याच्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असून, पर्यायी तेल पुरवठादार देशांशी चर्चा करत आहे. मात्र, जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता आणि युद्धाचे सावट पाहता, प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने इंधन वापरणे ही काळाची गरज आहे. इंधन बचतीचा हा संदेश केवळ आजच्या संकटापुरता मर्यादित नसून, भविष्यातील ऊर्जा सुरक्षिततेच्या आणि पर्यावरणाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला आहे.

#### जागतिक स्तरावर तेलाचा तुटवडा

या जागतिक पेचप्रसंगामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि परकीय चलन साठ्यावर मोठा ताण पडण्याची शक्यता सरकारने वर्तवली आहे. इराण आणि अमेरिका यांच्यातील तणावामुळे 'होर्मुझची सामुद्रधुनी' हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल पुरवठा मार्ग बाधित होण्याचा धोका निर्माण झाला आहे. भारत आपल्या गरजेच्या कच्च्या तेलाची मोठी आयात या भागातून करतो. जर या मार्गावरून होणारी वाहतूक विस्कळीत झाली, तर जागतिक स्तरावर तेलाचा तुटवडा निर्माण होऊ शकतो.



» Selected

## पुढील वर्षभर सोने खरेदी टाळा : पंतप्रधान

**बंगळुरू :** नरेंद्र मोदी यांनी हैदराबाद येथील सभेत देशवासीयांना पुढील एक वर्ष सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केले. जागतिक स्तरावर सुरू असलेल्या अमेरिका-इस्त्रायल-इराण संघर्षामुळे तेलसंकट आणि पुरवठा साखळीवर गंभीर परिणाम झाला असून त्याचे पडसाद भारतावरही उमटत असल्याचे त्यांनी सांगितले. मोदी म्हणाले की, "पेट्रोल, डिझेल, गॅस आणि खतांचे दर युद्धामुळे प्रचंड वाढले आहेत. सरकार नागरिकांवर अतिरिक्त भार पडू नये म्हणून मोठे आर्थिक ओझे स्वतः उचलत आहे. मात्र, संकट कायम राहिल्यास सर्वांनी जबाबदारीने वागणे आवश्यक आहे." यावेळी त्यांनी नागरिकांना पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्यासह खाद्य तेलाच्या वापरातही बचत करण्याचे आवाहन केले. "देशहित सर्वोच्च मानून प्रत्येकाने संयम आणि सहकार्याची भूमिका घ्यावी," असेही मोदी यांनी स्पष्ट केले.

# निधीची कमतरता भासू देणार नाही !

## पालकमंत्री गुलाबराव पाटील: जळके येथे ग्रा.पं. कार्यालयाचे लोकार्पण

जन सम्राट टाईम्स

**जळगाव / पाळधी | प्रतिनिधी:** गुलाबराव पाटील यांच्या हस्ते जळके येथे नव्या ग्रामपंचायत कार्यालयाचे लोकार्पण तसेच दूध डेरीच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन उत्साहात पार पडले. ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. ग्रामपंचायत व दूध डेरीच्या पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्र्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

कार्यक्रमापूर्वी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या रामदेववाडी ते कुऱ्हाडदे या सुमारे ३ कोटी ८६ लाख रुपयांच्या चार किलोमीटर रस्त्याच्या कामाची पाहणी केली. खडीकरण पूर्ण झालेल्या या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचाही शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. शेतकऱ्यांसाठी



रस्ता ठरणार लाभदायक

या रस्त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. रस्त्यावर मोऱ्या, संरक्षण भिंती, खडीकरण, डांबरीकरण आणि मजबुतीकरणाची विविध कामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे वाहतुकीसह शेतीमालाच्या ने-आणीतही सुलभता निर्माण होणार आहे.

"ग्रामपंचायत कार्यालय हे गाव विकासाचे केंद्र"

यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, ग्रामपंचायत कार्यालय हे गावाच्या विकासाचे केंद्र असून लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या समस्या तत्परतेने सोडवण्यासाठी कार्यरत राहिले पाहिजे.

दुग्ध व्यवसाय हा शेतकऱ्यांना आर्थिक बळ देणारा व्यवसाय असून नव्या दूध डेरीमुळे महिला बचत गट आणि शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल, असे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी शेतीसोबत जोडधंद्याकडेही वळावे, असे आवाहन करत गावांच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली. तसेच विटनेर ते वसंतवाडी रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत प्रस्तावित करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या रामदेववाडी ते कुऱ्हाडदे या सुमारे ३ कोटी ८६ लाख रुपयांच्या चार किलोमीटर रस्त्याच्या कामाची पाहणी केली. खडीकरण पूर्ण झालेल्या या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाचाही शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला.

शेतकऱ्यांसाठी रस्ता ठरणार लाभदायक

या रस्त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. रामदेववाडी ते कुऱ्हाडदे रस्त्याचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

### मान्यवरांची मोठी उपस्थिती

या कार्यक्रमाला पवन सोनवणे, रमेशआप्पा पाटील, पी. के. पाटील, रवी कापडणे, शिवराज पाटील, राजेंद्र चव्हाण, राजू भैय्या पाटील, नवल पाटील यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, पोटनिवडणुकीत निवडून आलेल्या इंदुबाई वाघ आणि उज्वला मोरे यांचा सत्कारही पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेशआप्पा पाटील यांनी केले. प्रास्ताविक पी. के. पाटील यांनी तर आभार प्रदर्शन सरपंच राजू भैय्या पाटील यांनी मानले.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# 'लँड टायटलिंग ॲक्ट'ची जुलैपासून अंमलबजावणी

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** 'राज्यात येत्या जुलै महिन्यापासून 'लँड टायटलिंग ॲक्ट'ची अंमलबजावणी केली जाणार आहे. या कायद्यामुळे राज्यातील १४ कोटी जनतेच्या मालमत्तांना कायदेशीर संरक्षण मिळणार असून, जगात कुठेही बसूनही मालमत्तांचे व्यवहार करणे सुलभ होणार आहे,' अशी माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रविवारी येथे दिली. भारती विद्यापीठाच्या ६२व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमानंतर बावकुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. हा कायदा लागू करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य असून, त्यामुळे जमीन आणि मालमत्ता व्यवहारांमध्ये मोठा बदल घडेल, असा दावाही त्यांनी यावेळी केला. 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूल विभागाला 'लँड टायटलिंग ॲक्ट' लागू करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार कायद्याला अंतिम स्वरूप देण्याचे काम सुरू असून, येत्या जुलैमध्ये तो लागू करण्यात येईल. या कायद्यामुळे राज्यातील १४ कोटी जनतेच्या मालमत्तेची अधिकृत आणि निश्चित नोंदी तयार होतील.सध्या अनेक ठिकाणी जमिनीच्या मालकीवरून वाद, दुबार विक्री, बनावट कागदपत्रे किंवा वारसाहक्काचे प्रश्न निर्माण होतात. मात्र, 'लँड टायटलिंग ॲक्ट' लागू झाल्यानंतर प्रत्येक मालमत्तेची अधिकृत डिजिटल ओळख मिळणार असून, त्यावरील व्यवहार कोणते याची स्पष्ट आणि कायदेशीर नोंद राहणार आहे,' असे बावनकुळे यांनी सांगितले. ते म्हणालेत्यामुळे महाराष्ट्रातील मालमत्ता व्यवस्थापन जागतिक स्तरावरील प्रणालीशी जोडले जाईल. मालमत्ता व्यवहारातील पारदर्शकता वाढल्याने बँकिंग, उद्योग आणि गुंतवणुकीलाही चालना मिळेल, परदेशात किंवा देशाबाहेर राहणाऱ्या नागरिकांनाही जगात कुठेही बसून आपल्या मालमत्तेची माहिती पाहणे, व्यवहार करणे किंवा पडताळणी करणे शक्य होईल.'

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# ठिबक सिंचनाच्या नळ्यांत अडकलेल्या हरणांना जीवदान

## दोन काळवीटांची सुखरूप सुटका



जन सम्राट टाईम्स

**पाळधी, ता. जामनेर :** पाळधी परिसरातील शेतशिवारात ठिबक सिंचनाच्या नळ्यांमध्ये शिंगे अडकून तडफडणाऱ्या दोन काळवीट हरणांना शेतकरी, सर्पमित्र आणि प्राणीमित्रांच्या सतर्कतेमुळे जीवदान मिळाल्याची हृदयस्पर्शी घटना समोर आली आहे. अब्बास पठाण यांच्या शेतामध्ये दोन काळवीट हरणांची शिंगे ठिबक सिंचनाच्या नळ्यांमध्ये अडकली होती.

शिंगे घट्ट अडकल्याने दोन्ही हरणे बराच वेळ तडफडत होती आणि स्वतःची सुटका करून घेण्यासाठी धडपड करत होती. ही बाब शेजारील शेतकरी निळकंठ शिवदास माळी यांच्या निदर्शनास आली. त्यांनी तात्काळ सर्पमित्र तथा प्राणीमित्र नाना माळी यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. अथक प्रयत्नांनंतर सुखरूप सुटका माहिती मिळताच नाना माळी यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती शांतपणे हाताळली.

त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक ठिबक सिंचनाच्या नळ्या कापून हरणांची सुटका करण्याचे प्रयत्न सुरू केले. काही वेळाच्या अथक प्रयत्नांनंतर दोन्ही काळवीटांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. सुटका होताच दोन्ही हरणांनी जंगलाच्या दिशेने धाव घेतल्याने उपस्थितांनी सुटकेचा निश्वास सोडला. या घटनेमुळे परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले.अब्बास पठाण यांच्या शेतामध्ये दोन काळवीट हरणांची शिंगे ठिबक सिंचनाच्या नळ्यांमध्ये अडकली होती. शिंगे घट्ट अडकल्याने दोन्ही हरणे बराच वेळ तडफडत होती आणि स्वतःची सुटका करून घेण्यासाठी धडपड करत होती. ही बाब शेजारील शेतकरी निळकंठ शिवदास माळी यांच्या निदर्शनास आली. त्यांनी तात्काळ सर्पमित्र तथा प्राणीमित्र नाना माळी यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. अथक प्रयत्नांनंतर सुखरूप सुटका माहिती मिळताच नाना माळी यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती शांतपणे हाताळली. काही वेळाच्या अथक प्रयत्नांनंतर दोन्ही काळवीटांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले.

### वनविभागालाही माहिती

या घटनेची माहिती अशोक ठोंबरे यांनाही देण्यात आली. वेळेवर मदत आणि माणुसकीची भावना जपत शेतकरी, सर्पमित्र आणि प्राणीमित्रांनी मुक्या जीवांना दिलेले हे जीवदान परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे. वन्यजीव संरक्षणासाठी नागरिकांनी दाखविलेली संवेदनशीलता आणि तत्परता समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# चोरवड परिसरातील पाणीटंचाई प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने!

। जन सम्राट टाईम्स ।

**पारोळा | प्रतिनिधी:** चोरवड परिसरातील वाढत्या पाणीटंचाईच्या प्रश्नासाठी गेल्या दीड ते दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करणारे छोटूभाई पाटील यांच्या प्रयत्नांना अखेर यश मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. चोरवड, भोंडण, शिरसमणी, टिटवी आदी गावांतील शेतकरी आणि ग्रामस्थांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय नुकत्याच झालेल्या बैठकीत घेण्यात आला. पारोळा तालुक्यातील अनेक गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून शेतीसह पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला होता. ही परिस्थिती लक्षात घेता छोटूभाई पाटील यांनी संबंधित मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या सातत्याने भेटी घेत परिसरातील अडचणी शासन दरबारी मांडल्या. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील तसेच महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या निर्देशानुसार गिरणा पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत छोटूभाई



पाटील आणि अमोल पाटील यांच्या प्रयत्नातून पाटचारी संदर्भातील महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. पुढील एक ते दीड वर्षांत हे काम पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री गिरीश महाजन यांनी भ्रमणध्वनीद्वारे उपस्थित शेतकऱ्यांना दिले. या निर्णयामुळे चोरवड, भोंडण, टिटवी, महिंदळे आणि शिरसमणी परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढल्यास परिसरातील कृषी उत्पादनालाही मोठा फायदा होणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. बैठकीला व्ही. डी. पाटील, भोसले, विनोद पाटील, कुलदीप पाटील, सुशांत व्यास, डॉ. हर्षल माने, विजय सुदाम पाटील यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंच, पोलीस पाटील, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनधिकृत बांधकामावर कारवाईसाठी ज्योती म्हात्रे यांचे उपोषण!

। जन सम्राट टाईम्स ।

**कल्याण | प्रतिनिधी** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या अनधिकृत बांधकामांच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात येत नसल्याच्या निषेधार्थ ज्योती विनायक म्हात्रे यांनी महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर उपोषण सुरू केले असून आंदोलनाचा आज सातवा दिवस आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संजय गायकवाड यांनी उभारलेल्या कथित अनधिकृत बंगल्यावर प्रशासनाकडून कारवाई होत नसल्याचा आरोप करत ज्योती म्हात्रे यांनी आंदोलन छेडले आहे. तीव्र उष्णतेमध्ये सुरू असलेल्या या उपोषणामुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. "गुन्हा दाखल; पण कारवाई नाही" उपोषणकर्त्या ज्योती म्हात्रे यांनी सांगितले की, संबंधित बांधकाम अनधिकृत असल्याचे अधिकाऱ्यांनी घोषित केले असून एमआरटीपी



कायद्यान्वये गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात निष्कासनाची किंवा तोडक कारवाई होत नसल्याने प्रशासन केवळ कागदी प्रक्रिया पूर्ण करत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांनी अनेक वेळा पालिकेकडे लेखी तक्रारी व पाठपुरावा करूनही ठोस पावले उचलली गेली नसल्याचे सांगितले. त्यामुळे अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रशासनाच्या भूमिकेवर नागरिक नाराज या प्रकरणामुळे स्थानिक नागरिकांमध्येही नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. "अनधिकृत बांधकामांवर कारवाईचे आदेश असतानाही अंमलबजावणी का होत नाही?" असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. "पाणी नेमकं कुठे मुरतंय?" अशी चर्चा परिसरात रंगू लागली आहे. गेल्या काही महिन्यांपासून केडीएमसी क्षेत्रात अनधिकृत बांधकामांच्या मुद्द्यावर विविध आंदोलने आणि उपोषणे होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत विशेष बदल होत नसल्याची टीका होत आहे. उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीची चिंता कडक उन्हात आणि वाढत्या तापमानात सात दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणामुळे ज्योती म्हात्रे यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. उपोषणकर्त्यांच्या जीवितास काही धोका निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा गंभीर सवालही उपस्थित केला जात आहे. दरम्यान, या आंदोलनाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन संबंधित प्रकरणात ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## लावणी सादरीकरणाच्या अश्लीलतेवर नियंत्रण

**पुणे :** लावणी सादरीकरणातील वाढत्या अश्लीलतेवर नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने स्वतंत्र सेन्सॉर बोर्ड स्थापन करावे, अशी मागणी करत तमाशा कलावंतांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घातले आहे. यासंदर्भात निवेदन पाठविण्यात आले असून लवकरच मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याचा निर्धार लावणी कलाकारांनी रविवारी पुण्यात झालेल्या बैठकीत घेतला. लोककला आणि लावणीचे कार्यक्रम पारंपारिक पद्धतीनेच सादर झाले पाहिजेत. राष्ट्रवादी काँग्रेस चित्रपट आणि सांस्कृतिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित या बैठकीस ज्येष्ठ लावणी कलाकार मंगला बनसोडे, बरखा जळगावकर, अप्सरा जळगावकर, राजश्री काळे-नगरकर, वनमाला बागूल, संगीत बारी (कला केंद्र) अशोक जाधव, मोहित नारायणगावकर, अखिल महाराष्ट्र लोककलावंत संघटनेचे प्रदेशाध्यक्ष नारायण जावळेकर, कार्याध्यक्ष शिवाजी जावळेकर उपस्थित होते.

# रा.ति. काबरे विद्यालयाचा दहावीचा निकाल ८१.१० टक्के

## छायेश्वरी निकम प्रथम; विद्यार्थ्यांच्या यशाने विद्यालयाची परंपरा कायम

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल | प्रतिनिधी :** एरंडोल येथील रा.ति. काबरे विद्यालय चा इयत्ता दहावीचा निकाल यंदा ८१.१० टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. शाळेतील एकूण २५४ विद्यार्थ्यांपैकी २०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये छायेश्वरी झगडू निकम हिने ९२.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. समृद्धी ज्ञानेश्वर पाटील हिने ९१.२० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला,



तर पूर्वी हेमंत धामणे हिने ९० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. विद्यार्थ्यांचे अभिनंदन विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्रजी काबरे, सचिव राजूभाऊ मणियार, सहसचिव धिरजभाऊ काबरे, शाळेचे चेअरमन अनिलभाऊ बिर्ला तसेच संस्थेचे सदस्य सतीशभाऊ परदेशी आणि परेश बिर्ला यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शिक्षकांचे मार्गदर्शन ठरले यशाची गुरुकिल्ली शाळेचे मुख्याध्यापक एस. एस. राठी, उपमुख्याध्यापक पी. एच. नेटके, पर्यवेक्षक पी. एस. नारखेडे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. विद्यालयाच्या उल्लेखनीय निकालामुळे पालक आणि परिसरातून समाधान व्यक्त करण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या मेहनतीसह शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# जळगाव–जालना रेल्वे मार्गासाठी १३ मे रोजी पहूर येथे विशेष बैठक

जन सम्राट टाईम्स

**पहूर | प्रतिनिधी :** जळगाव-जालना रेल्वे मार्ग प्रकल्प कामाला वेग आला असून, या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी १३ मे २०२६ रोजी पहूर येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती एरंडोल विभागाचे उपविभागीय अधिकारी मनीष कुमार गायकवाड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. ही माहिती स्थानिक स्तरावर रामेश्वर भाऊ पाटील, योगेश भांडगे, राजू जाधव, ॲड. संजय पाटील आणि प्रदीप लोढा यांच्या माध्यमातून प्रसिद्ध करण्यात आली. रेल्वे मार्गासाठी जमिनींचे संपादन प्रसिद्धीपत्रकानुसार, जळगाव ते जालना या नव्या रेल्वे मार्गासाठी पहूर परिसरातील खासगी जमिनी संपादित करण्यात येत आहेत. यासाठी रेल्वे अधिनियम कलम 20 (A) अंतर्गत २६ मे २०२५ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली होती. त्यानंतर संपादित जमिनींची संयुक्त मोजणी करण्यासाठी भूमी अभिलेख विभागामार्फत ६ एप्रिल २०२६ रोजी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्ष मोजणीदरम्यान काही भूधारकांनी विरोध दर्शवल्याने ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# धरणगावात सत्यशोधक समाज संघाची सहविचार सभा उत्साहात संपन्न

## चार वर्षांत महाराष्ट्रात ५०० हून अधिक सत्यशोधक विधी; सामाजिक प्रबोधनाचा संदेश; २३ व २४ मे रोजी छ. संभाजीनगर येथे आयोजन

जन सम्राट टाईम्स

**बाभळे | ता. धरणगाव** धरणगाव येथील मोठा माळीवाडा समाज सभागृहात सत्यशोधक समाज संघ यांच्या वतीने आयोजित सहविचार सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक प्रबोधन आणि सत्यशोधक चळवळीला अधिक बळ देण्याच्या उद्देशाने या सभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत सावता महाराज, राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संघाच्या कार्याचा आढावा सभेच्या प्रारंभी जिल्हाध्यक्ष पी. डी. पाटील यांनी प्रास्ताविकातून संघाच्या गेल्या चार वर्षांतील कार्याचा आढावा घेतला. सत्यशोधक विवाह, दशपिंड विधी, गृहप्रवेश, साक्षगंध सोहळे तसेच सत्यशोधक विधीकर्ते प्रशिक्षण शिबिरांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.सभेच्या अध्यक्षस्थानी अरविंद खैरनार होते. प्रमुख अतिथी म्हणून मोठा माळीवाडा समाजाध्यक्ष व्ही.



टी. माळी आणि लहान माळीवाडा समाजाध्यक्ष रामकृष्ण महाजन उपस्थित होते. मान्यवरांचा शाल व महापुरुषांचे ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. "अंधश्रद्धा सोडून सत्यशोधक विचार स्वीकारा" अध्यक्षीय भाषणात अरविंद खैरनार यांनी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेचा इतिहास उलगडून सांगत महात्मा फुले यांनी अज्ञान, अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली असल्याचे स्पष्ट केले. ते म्हणाले, "गेल्या चार वर्षांत महाराष्ट्रभर ५०० हून अधिक सत्यशोधक विवाह, दशपिंड विधी, गृहप्रवेश आणि साक्षगंध सोहळे पार पडले आहेत. बहुजन समाजाने कर्मकांड आणि अंधश्रद्धेपासून दूर राहून सत्यशोधक विचार आत्मसात करावेत. महापुरुषांचे साहित्य घरोघरी पोहोचवून वाचन संस्कृती वाढविणे काळाची गरज आहे." राज्यभर विविध सामाजिक उपक्रम महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विजन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यभर निबंध, वक्तृत्व, चित्रकला, प्रश्नमंजुषा स्पर्धा, रक्तदान शिबिरे, पुस्तक प्रकाशन, वृक्षारोपण आणि कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण अभ्यासवर्ग अशा विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. दरम्यान, संघाचे कार्यकर्ते राजेंद्र वाघ यांनी २३ व २४ मे २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे राज्यस्तरीय अभ्यासवर्ग आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### सामाजिक कार्यकर्त्यांचा गौरव

सभेत सत्यशोधक समाज संघाने शेतकऱ्यांच्या वजा उत्पन्न दाखला संदर्भातील न्यायालयीन लढ्यात मिळविलेल्या यशाचाही उल्लेख करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते सुनील घनशाम सोनार यांना अभिष्टचिंतनानिमित्त 'गुलामगिरी' हा ग्रंथ भेट देण्यात आला. तसेच त्यांनी उपस्थितांना शिवाजी कोण होता? हा ग्रंथ भेट दिला. कार्यक्रमास नगरसेविका ज्योती पाटील, नगरसेवक परमेश्वर महाजन, लक्ष्मण महाजन, जेष्ठ पत्रकार कडू महाजन यांच्यासह बहुजन समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. डी. पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन आर. डी. महाजन यांनी मानले. सभा यशस्वीतेसाठी आबासाहेब राजेंद्र वाघ, लक्ष्मणराव पाटील, कैलास वाघ आणि जयेश माळी यांनी विशेष सहकार्य केले.